# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिक शुल्क प्रतीपुर्तीबाबत**

**(१) २८६९२ (२२-०२-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांचा शिक्षणाचा खर्च करण्याचा शासनाने निर्णय घेवूनही मराठवाड्यातील पाच हजाराहून अधिक विद्यार्थ्यांनी त्यांचे शैक्षणिक शुल्क न भरल्यामुळे शिक्षण थांबवल्याची बाब माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुष्काळी भागातील नागरिकांना दिलासा देणाऱ्या सरकारी योजनांची अंमलबजावणी शून्य असल्याबाबतचा अहवाल राज्य गुप्तवार्ता विभागाने माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान शासनास तीन वेळा सादर केला आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने दुष्काळग्रस्त भागामध्ये शासकीय योजनांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्याकरिता शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री. विनोद तावडे (०३-११-२०१८) :** (१) व (२) नाही.

सद्यःस्थितीत शालेय शिक्षण विभागाच्या दि. १३ जून, १९९६ च्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतचे शिक्षण व दि.६ फेब्रुवारी, १९८७ च्या शासन निर्णयान्वये इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षण मुलींना प्रमाणित दराने मोफत दिले जाते. तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना फी माफ सवलत दिली जाते. या शैक्षणिक सवलतींचा लाभ दुष्काळग्रस्त शेतक-यांचे पाल्य घेवू शकतात.

महसूल व वन विभागाने सन २०१४-१५ मधील रब्बी हंगामातील १२५३ गावांमध्ये व सन २०१५-१६ मधील खरीप हंगामातील १५७४७ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहिर

केली आहे. अशा एकूण १७,००० गावांतील इ. १० वी व इ. १२ वीच्या एकूण ८,८६,४५४ विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफी/प्रतीपूर्ती राज्य मंडळ, पुणे यांच्यामार्फत केली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पडसाळी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक शाळेची झालेली दुरवस्था**

**(२) ४१३९५ (२५-०६-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पडसाळी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक शाळा मोडकळीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंधरा ते वीस वर्षापूर्वी बांधलेल्या दोन्ही खोल्यांचे छत नादुरुस्त असून वरांड्यात पडले आहे तसेच विद्यार्थी याच धोकादायक व मोडकळीस खोल्यांमध्ये शिकत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी पंचायत समितीसमोर उपोषण करण्याचे आवाहन शाळा व्यवस्थापनाने दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास सदर शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-११-२०१८) :** (१) पडसाळी (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील प्राथमिक शाळा मोडकळीस आली होती, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
शाळा इमारत मोडकळीस आल्याने शाळेसाठी भाडयाने जागा घेऊन तेथे विद्यार्थ्यांची व्यवस्था करण्यात आली होती.
(३) होय
(४) सन २०१५-१६ मधील पंचायत समिती पन्हाळा कडील उपकर मधून रू.१,५०,०००/- व सर्व शिक्षा अभियान मधून इमारतीचे विशेष दुरूस्तीसाठी रू.२,९६,०००/- मंजूर करून इमारत दुरूस्तीचे काम पूर्ण केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागात नविन शाळा इमारती बांधण्यासाठी व जुन्या शाळा इमारतींची दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध होण्याबाबत**

**(३) ४३२७८ (१६-०६-२०१६). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव उर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागात नविन शाळा इमारती बांधण्यासाठी व जुन्या शाळा इमारतींची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने किती निधी मंजूर केला तसेच केंद्र शासनाकडून सदर कामासाठी किती निधी प्राप्त झाला आहे,
(२) असल्यास, केंद्र शासनाकडून अद्यापही निधी प्राप्त झाला नाही, हे ही खरे आहे काय, असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, शासनाने यासाठी स्वत: निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-११-२०१८) :** (१) सर्व शिक्षा अभियानांतर्गत सन २०१५-१६ साठी शाळा बांधकाम व दुरूस्तीसाठी रू.८८०५.२९ लक्ष निधी प्राप्त झाला होता व त्यापैकी केंद्र शासनाकडून रू.५६०३.६९ लक्ष निधी प्राप्त झाला होता.
(२) हे खरे नाही.
(३) उपरोक्त रू.८८०५.२९ लक्ष पैकी रू.३२०१.६६ लक्ष निधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने शाळा दुरुस्तीच्या २१ प्रस्तावांना मान्यता देऊनही कामे सुरु झाली नसल्याबाबतत**

**(४) ४७३७० (२५-०६-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने सुमारे ५९ लाखाहुन अधिक रक्कमेच्या शाळा दुरुस्तीच्या २१ प्रस्तावांना दिनांक २१ ऑक्टोबर २०१४ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता देऊनही अदयापपावेतो सदरची कामे सुरु करण्यात आलेली नाही, ही बाब माहे ऑगस्ट २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय.
(२) असल्यास सदरच्या कामांना कार्यारंभ आदेश अदयापही देण्यात आलेला नसल्याने सदरचा निधी व्यपगत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय, असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्यात आली आहे काय,
(३) तसेच नाशिक जिल्हा परिषदेच्या दीड हजार शाळा आणि या शाळांतील विद्यार्थी सुरक्षित नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या शाळांभोवती संरक्षक भिंत बांधण्याकरिता पाच कोटी रुपयांची मागणी जिल्हा नियोजन मंडळाकडे करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

नाशिक जिल्हा परिषदेने दिनांक ३१/०३/२०१५ रोजी २१ कामांसाठी २५ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता दिली होती. जून २०१६ ला त्यापैकी १० कामे पूर्ण व ७ प्रगतीपथावर होती. एका कामाचे निविदा प्रकिया झाली नाही तसेच एक काम निर्लेखित झाले आहे. २ कामे रद्द झाली आहेत.

(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यातील (जि.बीड) अनेक प्राथमिक शाळांना स्वत:ची इमारत नसल्याबाबत**

**(५) ५१४२३ (१२-०६-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यातील (जि.बीड) अनेक प्राथमिक शाळांना स्वत:ची इमारत नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्य सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यातील शाळांना इमारत उभारण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाकडून अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यातील सर्व प्राथमिक शाळांना स्वत:ची इमारत आहे. केवळ जिल्हा परिषद शाळा कडा ता.आष्टी येथे २४ वर्गखोल्यांपैकी १२ वर्गखोल्या ग्रामपंचायतीच्या मालकीच्या आहेत.

(२) आवश्यकतेनुरूप शाळा इमारतींना निधी उपलब्ध करून देण्याची तजवीज ठेवली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्हयातील तळसंदे व देवरवाडी हेमाडपंथी श्री शेषशाही महाविष्णू व वैजनाथ मंदिराची झालेली दुरवस्था

**(६) ५८३५५ (०५-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळसंदे (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील विष्णू जलाशयाच्या मध्यभागी असलेल्या हेमाडपंथी श्री शेषशाही महाविष्णू मंदिराची पूर्णतः पडझड झाल्याचे तसेच सदर देवस्थानाचा 'अ' वर्ग पर्यटन स्थळांत समावेश करण्याची मागणी होत असल्याची बाब माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच देवरवाडी (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील हेमाडपंथी वैजनाथ मंदिर आणि परिसराची दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-१०-२०१८) :** (१) हे अंशतः खरे आहे.

सदर देवस्थानाचा “अ” वर्ग पर्यटन स्थळात समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात अकरावीच्या प्रवेशासाठी पहिल्या फेरीनंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचे पसंतीक्रम बदलण्याची संधी मिळणार असल्याबाबत

**(७) ७६००८ (२०-०४-२०१७). श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अकरावीच्या प्रवेशासाठी पहिल्या फेरीनंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचे पसंतीक्रम प्रत्येकवेळी बदलण्याची संधी मिळणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिल्या फेरीत पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाल्यास विद्यार्थ्याला तेथे पूर्ण शुल्क भरुन प्रवेश घेणे बंधनकारक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे
(३) सन २०१७-१८ मध्ये इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडली. या प्रवेश प्रक्रियेतून एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील शाळांमध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(८) ८०३३९ (२०-०४-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षक आणि शैक्षणिक साहित्यापेक्षा पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी आणि देखभालीसाठी सर्वाधिक खर्च होत असतानाही शाळांमध्ये मुलभूत सुविधांचा अभाव दिसत असल्याचे "असर" च्या पाहणीतून माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शाळामध्ये पिण्याच्या पाण्याची टाकी आहे पण पाणी नाही, स्वच्छतागृहे आहेत पण वापरण्यायोग्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-१०-२०१८) :** (१) "असर" पाहणी अहवालात मुलभूत सुविधांचा अभाव असल्याचे नमूद आहे. परंतु यु-डायस आकडेवारीनुसार बहुतांश शाळांमध्ये मुलभूत सुविधा असल्याचे दिसते.
(२) व (३) बहुतांश शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. ज्या शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी यंत्रणा नाही अशा ठिकाणी पाणी साठवून उपलब्ध करण्यात येते. जवळपास सर्व स्वच्छतागृहे वापरायोग्य राहतील अशी खबरदारी घेण्यात येते. तसेच अपवादात्मकरित्या जिथे पायाभूत सुविधा नाहीत तेथील कामांचा सर्व शिक्षा अभियानाच्या कार्ययोजनेत निधीच्या उपलब्धतेनुसार समावेश केला जातो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### बुलढाणा शहरात अवैध कोचिंग क्लासेसचे प्रमाण वाढल्याबाबत

**(९) ८२६०३ (२०-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा शहरात अवैध कोचिंग क्लासेसचे प्रमाण वाढल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने शहरातील कोचिंग क्लासेसची तपासणी केली आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुसार अवैध कोचिंग क्लासेसवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०९-२०१८) :** (१) सदर बाब निदर्शनास आली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे खांडोत्री (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील शाळा वर्गखोल्या धोकादायक असल्याबाबत**

**(१०) ८३९४५ (२०-०४-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खांडोत्री (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील पूर्व प्राथमिक मराठी शाळेच्या वर्गखोल्या सन १९५५ साली बांधलेल्या असून सदयस्थितीत त्या अत्यंत धोकादायक असून सदर वर्गखोल्यांना लागून दरड असल्याने विदयार्थी व शिक्षकांच्या जिविताला धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी नवीन वर्गखोल्या बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-१०-२०१८) :** (१) हे खरे नाही.
जिल्हा परिषद शाळा खांडोत्री, जि.रत्नागिरी ही शाळा सन २००७-०८ व २००८-०९ मध्ये बांधलेल्या ३ वर्गखोल्यांत भरविण्यात येते. विद्यार्थी संख्येनुसार असून एका वर्गखोलीची आवश्यकता आहे.
(२) होय
(३) आवश्यक असलेले वर्गखोली बांधकाम जिल्हा वार्षिक योजना (सन २०१८-१९) मध्ये समाविष्ट करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेलेल्या मुलांकरिता महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ स्थापन करण्याबाबत**

**(११) ८५२१३ (२३-०८-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१). राज्यातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या आणि शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर गेलेल्या मुलांकरिता महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मंडळातून कोणकोणत्या इयत्तांचा अभ्यासक्रम घेण्यात येणार आहे,
(३) असल्यास, शासन या मुक्त विद्यालयाची सुरुवात कोणत्या शैक्षणिक वर्षापासून करणार आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) इ.५ वी, इ.८ वी व इ.१० वी, इ.१२ वी इयत्तांचा अभ्यासक्रम घेण्यात येणार आहे.
(३) राज्यमंडळ स्तरावर महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या प्रांरभिक कामकाज सुरु करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील पाली अष्टविनायक तीर्थ क्षेत्रामध्ये पर्यटक व भाविकांसाठी नळपाणी पुरवठा योजना मंजूर करण्याबाबत

**(१२) ९०६७७ (१९-०८-२०१७). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील पाली हे अष्टविनायकापैकी एक अष्टविनायक तिर्थक्षेत्र असून येथे दररोज हजारोंच्या संख्येने पर्यटक व भाविक भेट देत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ठिकाणी भाविक व पर्यटकांसह ग्रामस्थांना पाणी पुरवठा योजना नसल्यामुळे गैरसोय होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तिर्थक्षेत्रासाठी भाविक व पर्यटकांसाठी विशेष बाब म्हणून पाणी पुरवठा योजना मंजूर करून निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सुधागड (जि.रायगड) तालुक्यातील पाली, ता.सुधागड नळ पाणी पुरवठा योजनेचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम २०१८-१९ मध्ये करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये स्थानिक महाविद्यालयात प्राधान्याने प्रवेश मिळण्यासाठी

**(१३) ९४१९० (२३-०८-२०१७). श्री.राज पुरोहित (कुलाबा), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये स्थानिक महाविद्यालयात प्राधान्याने प्रवेश मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत लोकप्रतिनिधींनी सबंधीत शिक्षण विभागास पत्रव्यवहार व पाठपुरावा सुद्धा केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मुंबई महानगर क्षेत्रामध्ये इ.११ वी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने होते. सदर प्रवेश मा.उच्च न्यायालयाने वेळावेळी दिलेल्या निर्देशानुसार गुणवत्तेनुसार करण्यात येतात. या प्रक्रियेमध्ये स्थानिक विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. सबब, अशी तरतूद करता येईल किंवा कसे याबाबत विचारविनिमय करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी, विधी व न्याय विभागाचे अधिकारी व लोकप्रतिनिधी यांची समिती गठीत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे तेल्हारा (जि.अकोला) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची जागा अनधिकृतपणे हस्तांतरीत केल्याबाबत

**(१४) १०१६७२ (२९-१२-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तेल्हारा (जि.अकोला) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेची जागा अनधिकृतपणे बळकावणा-या संस्था व संस्थाचालकांविरुध्द कारवाई करणेबाबत मा. पालकमंत्री यांना वांरवार स्थानिक लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदने दिली आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-०९-२०१८)** : (१) यासंदर्भातील निवेदन आढळून आले नाही. तथापि, सदर जागेतील अतिक्रमणाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर महानगरपालिकेतील पाणीपुरवठा अधिकाऱ्यांच्या रिक्त पदाबाबत**

**(१५) १०८६०३ (१५-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिका आयुक्त यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांच्या नियुक्ती करिता मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आजतागायत कोणाचीही नेमणूक केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत सदर रिक्त पदांवर तातडीने अधिकाऱ्यांची नियुक्ती होणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करणेत येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-०९-२०१८)** : (१) होय.
(२) व (३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अखत्यारितील स्वतंत्र प्राधिकरण असून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिनियम, १९७६ नुसार प्राधिकरणामध्ये अभियंत्यांची नियुक्ती करण्याचे पूर्ण अधिकार प्राधिकरणाला आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील सहायक अभियंता श्रेणी-२ (स्था) १ पद व शाखा अभियंता (स्था) २ पदे कोल्हापूर महानगरपालिका येथे सद्यस्थितीत प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील कार्यकारी अभियंता (स्था) संवर्गाची पदे मोठया प्रमाणात रिक्त असल्याने कोल्हापूर महानगरपालिकेकरीता प्रतिनियुक्तीने कार्यकारी अभियंता (स्था) यांच्या सेवा उपलब्ध करुन देणे शक्य नसल्याचे तसेच महानगरपालिकेने त्यांच्या स्तरावर व्यवस्था करण्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांना दिनांक २७.१०.२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सर्व शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी देण्याबाबत**

**(१६) १०९२६६ (०६-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासनमान्य प्राथमिक व माध्यमिक शाळांतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना १२ वर्षाच्या सेवेनंतर वरिष्ठ व २४ वर्षाच्या सेवेनंतर दिनांक १ जानेवारी १९८६ पासून मूळ वेतनश्रेणी, वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड वेतन श्रेणी अशी त्रिस्तरीय वेतनेश्रेणी तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती दिनांक १ आक्टोंबर, १९९५ पासून लागू करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दिनांक २३ ऑक्टोंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास शासन निर्णयात बदल करून शालेय शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने प्रगत शाळा व शाळासिद्धी प्रकल्पामध्ये शाळांना 'अ' श्रेणी अनिवार्य केली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना सेवाअंतर्गत प्रशिक्षण करण्याच्या अटीवर वरिष्ठ/निवड वेतन श्रेणी देय ठरते परंतु प्राथमिक/माध्यमिक शाळेतील शिक्षकांना मात्र सेवांर्गत प्रशिक्षण केल्याशिवाय वरिष्ठ/निवड वेतन श्रेणी देय्य ठरत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच या शाळांमधील शिक्षकांना इयत्ता ९ वी व १० वी चा निकाल ८० टक्यापेक्षा जास्त असल्यावरच वरिष्ठ वेतनश्रेणी व निवडश्रेणी देय राहील अशा जाचक अटींचा समावेश नवीन शासन निर्णयात केला हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या शासन निर्णयातील वरील जाचक अटी तात्काळ रद्द कराव्या व पूर्ववत सरसकट सर्व शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी देय करावी या बाबतची मागणी निवेदनाद्वारे नागपूर विभागाच्या जनप्रतिनिधींनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासमारास केली, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसानार विनाअट वरिष्ठ/निवड वेतन श्रेणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०६-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती दिनांक ३० एप्रिल, १९९८ पासून लागू करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) अंशत: खरे आहे.

(६) शाळा सिध्दी या कार्यक्रमातील शिक्षकांशी संबंधित नसलेले मुद्दे वगळून ग्रेड देणेबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

---

## पुणे येथील शिक्षण उपसंचालकांच्या आदेशाचे अल्पसंख्याक शिक्षण संस्थाकडून उल्लघंन होत असल्याबाबत

**(१७) ११००५४ (०६-०४-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील अल्पसंख्याक शिक्षण संस्थाना नियमानुसार अल्पसंख्याक विद्यार्थांना प्रवेश दिला आहे काय याबाबतची पटपडताळणी करून दिनांक ५ फेब्रुवारी २०१८ पर्यंत अहवाल सदर करण्याचे आदेश शिक्षण उपसंचालक यांनी माहे ऑगस्ट २०१६ ते डिसेंबर २०१७ या कालावधीमध्ये ८ वेळा दिले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २०० अल्पसंख्याक शाळांपैकी बहुतांश सर्व शाळां या आदेशाचे उल्लंघन करीतअसल्याचे निदर्शास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्पसंख्याक संस्थांनी त्यांच्या शाळांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश देणे बंधनकारक आहे मात्र शासनाने घालून दिलेल्या या अटी व शर्तीचे पालन या शाळांकडून केले जात नसल्याची तक्रार उपसंचालकाकडे विद्यार्थी संघटना व राजकीय पक्ष यांनी लेखी पत्राद्वारे वारंवार केली आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास शिक्षण उपसंचालकांच्या आदेशा विरोधात विद्यार्थी संघटनाने शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयामध्ये आंदोलन करण्याचा पत्राद्वारे इशारा दिला आले हेही खरे आहे काय,

(५) असल्यास शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, व त्यानुसार अल्पसंख्याक संस्थांच्या शाळेतील पटपडताळणी करण्याबाबत तसेच सदर संस्थेच्या शाळांमधून आरटीईअंतर्गत प्रवेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

(५) आर.टी.ई.२५ टक्के प्रवेश अल्पसंख्यांक शाळांना लागू नाहीत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर (जि.सोलापूर) शहरात बांधण्यात आलेल्या जलतरण तलावाची दुरवस्था झाली असल्याबाबत

**(१८) ११०५१९ (१८-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर (जि.सोलापूर) शहरात शासनाने बांधलेल्या जलतरण तलावाचे उदघाटन होण्यापुर्वीच अनेक त्रुटी आढळून आल्या असून जलतरण तलावाची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करुन उक्त जलतरण तलाव नागरिकांसाठी त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात येणार वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

मार्च, २०१८ मध्ये सदरचा जलतरण तलाव नागरीकांसाठी खुला करण्यात यावा अशी मागणी केल्यामुळे जलतरण तलावाच्या अनुषंगाने काही कामे अपूर्ण असूनही जलतरण तलाव हा नागरिकांना पोहण्यासाठी योग्य असल्याने सदर जलतरण तलावाचा लोकार्पण सोहळा दिनांक ०९.०४.२०१८ रोजी मा.सहकार मंत्री यांच्या शुभहस्ते करण्यात आला असून जलतरण तलावाचा वापर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यात स्वच्छ भारत अभियानांतर्गत**
**बांधण्यात येणाऱ्या शौचालयाबाबत**

**(१९) ११२९४० (१९-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेहकर (जि.बुलडाणा) तालुक्यात स्वच्छ भारत अभियानांतर्गत शौचालय बांधकाम संथगतीने होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणची गुड मॉर्निग पथकांची कामे बंद झाल्याचे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त तालुक्यात स्वच्छता मोहिम राबविण्याकरिता कोणत्या विशेष कार्यक्रमांची अंमलबजावणी केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१४-११-२०१८) :** (१) अंशत: खरे नाही.

मेहकर (जि.बुलढाणा) तालुक्यात सन २०१७-१८ या वर्षात २२,९९५ शौचालय बांधकामाचे उद्दिष्ट होते. त्यापैकी डिसेंबर,२०१७ पर्यंत ७,८०६ वैयक्तिक शौचालय बांधकाम करण्यात आले.
(२) हे खरे नाही.

गुड मॉर्निग पथक सक्रिय होते.
(३) हे खरे नाही.

दिनांक ३१ मार्च,२०१८ पर्यंत पायाभूत सर्वेक्षण,२०१२ मधील यादीतील बुलढाणा जिल्हयातील सर्व कुटुंबांना शौचालय उपलब्ध झाली असून सदर शौचालयांचा वापर होत आहे. त्याअनुषंगाने दिनांक ३१ मार्च,२०१८ रोजी बुलढाणा जिल्हा हागणदारीमुक्त घोषित करण्यात आला आहे. शौचालयाच्या वापराबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महिला व बालकल्याण, शिक्षण विभाग तसेच इतर सर्व विभागांचे कर्मचारी, ग्रामपंचायत, सचिव, स्थानिक ग्रामपंचायत, कर्मचारी, महिला बचत गट व विविध मंडळे यांच्या सहकार्याने प्रत्यक्ष गृह भेट, जनजागृतीपर सभा, वक्तृत्व स्पर्धा, माहिती पत्रके तसेच गुड मॉर्निंग पथक याप्रमाणे जनजागृती करण्यात येत असून शौचालयाचा वापर होत आहे.

---

**दिंडोरी (जि.नाशिक) तालुक्यातील पश्चिम भागातील अनेक गावांमध्ये हागणदारी मुक्त गाव योजना राबविली जात नसल्याबाबत**

**(२०) ११३१३१ (१५-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.भारत भालके (पंढरपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिंडोरी (जि.नाशिक) तालुक्यातील पश्चिम भागातील अनेक गावांमध्ये हागणदारी मुक्त गाव योजना असफल झाली असून ही योजना फक्त ठेकेदारांचे हित लक्षात घेऊन राबविली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील ग्रामसेवक, संबंधित विभागाचे अधिकारी, ठेकेदार आर्थिक संगनमत करुन अनुदानात गैरव्यवहार करीत असल्याने अनेक शौचालयांची कामे अपूर्ण आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच या योजनेत गैरप्रकार करणारे अधिकारी, कर्मचारी व ठेकेदार यांच्यावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत दिंडोरी (जि.नाशिक) तालुक्यात कोठेही पंचायत समिती स्तरावरुन किंवा ग्रामपचायंत स्तरावरुन ठेकेदारांची नेमणूक केलेली नाही किंवा ठेकेदारास रक्कम अदा केलेली नाही.

(२) हे खरे नाही.

वैयक्तिक शौचालय बांधकाम पूर्ण केल्यावर तपासणीअंती प्रोत्साहन अनुदान थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पहेला (जि.भंडारा) येथील गांधी विद्यालयातील पोषण आहारात झालेला गैरव्यवहार**

**(२१) ११३५३३ (०६-०४-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पहेला (जि.भंडारा) येथील गांधी विद्यालय शिक्षण संस्था कोंढा येथील मुख्याध्यापिका, साहाय्यक शिक्षक व श्री नरेंद्र कावळे सहसचिव यांनी शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत गैरव्यवहार केल्याचे माहे डिसेंबर २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आल्याने अड्याळ पोलीस स्टेशन येथे श्रीमती मनीषा गजभिये अधीक्षक (प्रशासन) शालेय पोषण आहार पंचायत समिति. भंडारा यांनी गुन्हा नोंदविला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन शालेय पोषण आहारामध्ये २,०६,४४५ रुपयांचा अपहार केलेल्या सदर संस्थेच्या मुख्याध्यापिका, सहाय्यक शिक्षक तसेच संबंधिताकडून उक्त रक्कमेची वसुली करणार आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व त्यानुसार सबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) संबंधित संस्थेचे सह सचिव व शाळेच्या मुख्याध्यापिका यांच्याकडून वसूलपात्र रक्कम आणि दंडाची रक्कम वसूल करण्यात येत आहे.तसेच, दोषींविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याचे निर्देश संबंधित संस्थेला दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील राष्ट्रीय पेयजल योजनेसाठी निधी न दिल्याबाबत**

**(२२) ११३७५८ (१५-०४-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाकडून राष्ट्रीय पेयजल योजना राबविण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय पेयजल योजनेसाठी रू.१७०० कोटी निधी न दिल्यामुळे १४०० योजना बंद झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर योजना पूर्ण करण्यासाठी शासनाकडून किती निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०९-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही.
(३) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात केंद्र हिश्यातंर्गत रु. ३३८ कोटी,१३ लक्ष व राज्य हिश्यातंर्गत रु. ५४१ कोटी, ३२ लक्ष अशी एकूण रु. ८७९ कोटी, ४५ लक्ष तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी केंद्र हिश्यातंर्गत रू. २८२ कोटी, ४७ लक्ष इतका निधी प्रत्यक्षात प्राप्त झाला आहे. त्यापैकी रु. २०१ कोटी, ४२ लक्ष, ९२ हजार इतका निधी अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्यात आला आहे. उर्वरित रु. ८१ कोटी, ४ लक्ष, २५ हजार इतक्या निधीपैकी आदिवासी घटक व अनुसूचित जाती क्षेत्र उपयोजनांसाठी अनुक्रमे रु. ४० कोटी, रू. ५८ लक्ष, रू. ५ हजार व रू. २८ कोटी, रू. ३२ लक्ष, रू. २० हजार असे एकूण रु. ६८ कोटी, ९०लक्ष, २५ हजार इतका निधी या घटकासाठी प्राप्त झाला आहे. परंतू उक्त घटकांसाठी मागणी नसल्याने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात वितरीत करता आला नाही. तसेच रु. १२ कोटी,१४ लक्ष इतका निधी सपोर्ट व पाणी गुणवत्ता संनियंत्रण व सर्वेक्षण या घटकांकरीता संचालक, वासो यांना वितरीत करण्याची परवानगी घेण्याबाबत वित्त/ आदिवासी/ सामाजिक न्याय विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे.

तसेच राज्य हिश्यांतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रु. ५४१ कोटी, ३२ लक्ष इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली होती. उक्त रक्कमेपैकी इतर लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजनाने रक्कम प्राप्त करून रु. ५५९ कोटी, ३१ लक्ष, ८१ हजार इतकी रक्कम अंमलबजावणी यंत्रणांना वितरीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सोलापूर येथे राज्याच्या युवा धोरण २०१२ नुसार वसतीगृहाची स्थापना करण्याबाबत

**(२३) ११६३०४ (०६-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर येथे राज्याच्या युवा धोरण २०१२ नुसार वसतीगृहाची स्थापना करण्याकरिता स्थनिक लोकप्रतिनधी यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना वारंवार निवेदनाद्वारे मागणी करण्यात येवूनही युवा वसतीगृहाची स्थापना करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर येथे युवा वसतीगृहाची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०९-२०१८) :** (१) निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही व युवा वसतीगृहाची स्थापना करण्यात आलेली नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील ५१ किल्यांवर एकही शौचालय नसल्याबाबत**

**(२४) ११६५२१ (२०-०७-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या अखत्यारीत असणाऱ्या महाराष्ट्रातील ५१ किल्ल्यांवर एकही शौचालय नसल्याचे माहे माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रातील किती गडकिल्ल्यांवर शौचालय उपलब्ध आहेत व त्यानुसार गड किल्ल्यांचे पावित्र्य जपणे अवघड झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार महाराष्ट्रातील ५१ किल्ल्यांवर शौचालय उभारणीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) महाराष्ट्रातील गड किल्ल्यांची किरकोळ जतन, दुरूस्ती व संवर्धनाच्या कामाकरिता तसेच प्रसाधनगृहाची उभारणी व देखभाली करीता निधी सेवाभावीसंस्था / व्यक्ती यांचेकडून अथवा लोकसहभागातून / लोकवर्गणीतून उपलब्ध करून देण्याबाबतचा दि.१२ जुलै, २०१८ रोजीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्हा परिषदेच्या नियमबाह्य काम करणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांच्या चौकशीबाबत**

**(२५) ११६५२४ (२४-०५-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी, यांच्या कारभाराच्या चौकशीचे आदेश शिक्षण उपसंचालक यांनी माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शिक्षण विभागात अनियमितता व बोगस शिक्षक मान्यता, मुख्याध्यापक मान्यता, शाळांच्या स्वमान्यता, प्रथम मान्यता नियमबाह्य पद्धतीने काम करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२६-०९-२०१८) :** (१) प्राथमिक शिक्षण संचालनालयाने त्यांच्या दि. २.२.२०१८ च्या पत्रान्वये चौकशीचे आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांना दिले आहे.
(२) एक उपशिक्षिका व एक मुख्याध्यापिका यांच्या मान्यतांना अनाधिकाराने वैयक्तिक मान्यता देऊन तद्नंतर त्यास स्थगिती दिली आहे.
(३) सदर प्रकरणी प्राथमिक चौकशी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह परिपूर्ण अहवाल शासनास सादर करण्याचे निर्देश शिक्षण आयुक्त यांना दिले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित "प्रोब्लेम ऑफ रुपी-इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन" या इंग्रजी ग्रंथाचा मराठी अनुवाद करण्याबाबत**

**(२६) ११६८५९ (२०-०७-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व):** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित "प्रोब्लेम ऑफ रुपी-इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन" या इंग्रजी ग्रंथाचा "रुपयाचा प्रश्न- उद्गम आणि उपाय" हा मराठी अनुवाद अयोग्य असल्याचा साक्षात्कार चरित्र साधने प्रकाशन समितीला २२ वर्षांनी झाल्याचे माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच, चरित्र साधने प्रकाशन समितीने दर्जेदार ग्रंथ उपलब्ध होण्यासाठी अनुवादक उपलब्ध होत नसल्याचे तसेच, दर्जेदार ग्रंथाचे अनुवाद करण्यामागे कमी पडत असल्याची कारणे पुढे केली जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, २२ वर्षानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर लिखित "प्रोब्लेम ऑफ रुपी-इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्युशन" या इंग्रजी ग्रंथाचा "रुपयाचा प्रश्न- उद्गम आणि उपाय" हा मराठी अनुवाद अयोग्य असल्याचे निदर्शनास येण्याची नेमकी काय कारणे आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय असल्यास सदर पुस्तकाचा योग्य मराठी अनुवाद वाचकांना लवकरात लवकर उपलब्ध होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबांची काय कारणे आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-११-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, दि.८.१०.२०१३ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीतील इतिवृत्तानुसार दुसऱ्या अनुवादकाकडून अनुवाद करण्याचे निर्देश देण्यात आले असून, दुसऱ्या अनुवादकांचा शोध घेऊन त्यांचेमार्फत कार्य करुन घेण्याचे प्रयत्न चालू आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील विशेषत: मराठवाडा व विदर्भातील ग्रामीण भागातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत**

**(२७) ११६९२७ (२३-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मराठवाडा व विदर्भातील ग्रामीण भागातील ४३६६५ गावांपैकी २६३४१ खेडी व १२९५६ वाडया वस्त्यांवर पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने साडेतीन हजारांहून अधिक गावांना एप्रिल, २०१८ पासूनच पाणीटंचाई निर्माण होणार असल्याचा अंदाज वर्तविला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ३१ मे, २०१८ अखेर राज्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या गावांची एकूण संख्या किती आहे तसेच मराठवाडा, विदर्भ तसेच राज्यातील इतर ग्रामीण भागात उपलब्ध पाणीसाठयाचे नियोजन व राज्य टँकरमुक्त करुन जनतेला पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-०९-२०१८) :** (१) राज्यातील संभाव्य पाणी टंचाईच्या अनुषंगाने सर्व जिल्हयाचे ऑक्टोबर ते डिसेंबर, जानेवारी ते मार्च आणि एप्रिल ते जून असे त्रैमासिक संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडे तयार करण्यात येतात.

त्यानुसार ऑक्टोबर, २०१७ ते जून, २०१८ या कालावधीसाठी संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयानुसार औरंगाबाद विभागामध्ये १४६०० गावे व ३६२७ वाडया तसेच विदर्भामध्ये म्हणजेच नागपूर विभागात एकूण २९४६ गावे व ५८ वाडया, तर अमरावती विभागात एकूण ३९३९ गावे व ० वाडयांमध्ये टंचाई अंतर्गत उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या आहेत.

तथापि, प्रश्नात नमुद करण्यात आलेली २६३४१ गावे व १२९५६ वाडया ही आकडेवारी संपूर्ण राज्यातील संभाव्य टंचाई आराखडयानुसार यावर्षी ऑक्टोबर २०१७ ते जून २०१८ या संपूर्ण कालावधीसाठी संपूर्ण राज्यासाठी तयार करण्यात आलेल्या संभाव्य टंचाई कृती आराखडयाची आहे.

(२) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेने माहे सप्टेंबर, २०१७ मधील भूजल पातळीच्या अभ्यासाच्या आधारे तयार केलेल्या अहवालावरुन राज्यातील ३६६० गावांमधील भूजल पातळीमध्ये १ ते २ मी. ने घट, १९३३ गावांमधील भूजल पातळीमध्ये २ ते ३ मी. ने घट व १५४६ गावांमधील भूजल पातळीमध्ये ३ मी. पेक्षा जास्त घट असल्याचे सांगितले होते.

(३) संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयामध्ये २६३३१ गावे आणि १२९५६ वाडयांचा समावेश आहे.

वर्ष २०१७-१८ च्या टंचाई कालावधीत दि.१८ जून, २०१८ च्या साप्ताहिक टँकर अहवाल नुसार १७९७ गावे १५३३ वाडयांना एकूण १८०१ टँकरद्वारे
पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे.

राज्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणा-या सर्व गावांना पिण्याच्या पाण्याची टंचाई अंतर्गत घेण्यात येणा-या उपाययोजना राबविण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोकण विभागाच्या यात्रा उत्सव कोशाच्या कामाबाबत**

**(२८) ११६९३६ (२०-०७-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या वतीने पहिला यात्रा व उत्सव कोश पूर्ण झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर यात्रा व उत्सव कोश हा विदर्भ विभागावर आधारित असून त्यामध्ये ५०० पेक्षा अधिक यात्रा महोत्सवाची माहिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आगामी कालावधीत कोकण विभागाच्या यात्रा उत्सव कोशाचे काम सुरु करण्यात येणार असून राज्यातील सर्व विभागातील यात्रा व उत्सवांचे कोश पूर्ण होऊन सामान्य जनतेसाठी कधीपर्यंत उपलब्ध होणार आहेत,

(४) नसल्यास, त्याची काय कारणे आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१८) :** (१) होय.
(२) होय.
(३) सद्यस्थितीत, कोकण विभागाच्या यात्रा व उत्सवाचे काम हाती घेण्यात आले असून हा ग्रंथ सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्याच्या हेतूने पुढील वर्षापर्यन्त प्रकाशित करण्यात येईल. त्यानंतर टप्प्या-टप्प्याने विभागवार ग्रंथ निर्मितीचे काम हाती घेण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ठाणे बेलापुर औद्योगीक वसाहतीतील ४ रसायन कंपन्याना लागलेली भीषण आग

**(२९) ११७०३८ (२३-०७-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे बेलापुर औद्योगीक वसाहतीतील ४ रसायन कंपन्या जळून खाक झाल्याबाबत माहे एप्रिल-२०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर औद्योगीक वसाहतीतील रसायनीक जळीत प्रकरणात ३ कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर जखमी कामगारांना अर्थसहाय्य करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (२४-०९-२०१८) :** (१) दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी पहाटे अडीचच्या सुमारास एमआयडीसी खैरणे येथील अलमा स्पेशालिटी केमिकल्स प्रा. लि. एम.आय.डी.सी. महापे, नवी मुंबई या कारखान्यांमध्ये आग लागली व सदर आग बाजुच्या चार कारखान्यात पसरुन त्यांचे ही काही प्रमाणात नुकसान झाले.
(२) होय, हे खरे आहे. ३ जखमी कर्मचाऱ्यांपैकी २ कामगारांचा उपचारादरम्यान मृत्यु झाला असुन एका जखमी कामगारास उपचारानंतर दवाखान्यातून घरी सोडण्यात आले आहे.
(३) सदर घटनेबाबत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय आणि पोलीस विभागाने चौकशी केलेली आहे.

सदर कारखान्यामध्ये विजेच्या शॉर्ट सर्किटमुळे आग लागली व ती आजूबाजूला पसरली. सदर कारखाना विना परवाना चालू असल्याचे आढळुन आल्यामुळे कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७ अ (२) (क) व महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ चे नियम ४ (४), नियम ४ (१) (अ,ब,क) चे भंग आढळून आले असून, कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द न्यायालयात दोन खटले दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस विभागाकडून कारखान्यांच्या संचालकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. जखमी कामगार श्री. राजेंद्र प्रसाद चव्हाण यांचा औषधोपचाराचा खर्च कारखाना

व्यवस्थापनाने केला असून त्यांना दवाखान्यातुन घरी सोडण्यात आले आहे. मयत कामगार कै. माणीकचंद मायाशंकर गौतम व कै. असलम मोहम्मद यांच्या वारसास तात्काळ मदत व नुकसान भरपाई व्यवस्थापनाने दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गड-किल्ल्यांचे दुरुस्ती व संवर्धन करण्याबाबत

**(३०) ११७३३३ (२०-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील गड-किल्ल्यांच्या दुरुस्ती व संवर्धनाचे काम शासनाने सुरु केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणातील पूर्णगड व बांदकोट (जि.रत्नागिरी) व भरतगड व यशवंतगड (जि.सिंधुदुर्ग) या गडांच्या व किल्ल्यांच्या दुरुस्तीच्या कामांचा यात अंतर्भाव आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासाठी शासनाने किती निधी उपलब्ध केला आहे व पूर्णगड व बांदकोट (जि.रत्नागिरी) व भरतगड व यशवंतगड (जि.सिंधुदुर्ग) या गडांच्या व किल्ल्यांच्या दुरुस्ती तात्काळ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) पूर्णगड व बांदकोट (जि.रत्नागिरी) व भरतगड व यशवंतगड (जि.सिंधुदूर्ग) या गडांच्या व किल्ल्यांच्या दुरूस्तीच्या कामांना मंजूरी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयातील पाण्याच्या शुध्दीकरणाबाबत

**(३१) ११७३९८ (२५-०७-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील तालुकानिहाय गावांमध्ये दुषित पाण्याचे प्रमाण वाढले असून ग्रामीण भागात १०.५४ तर शहरी भागात ४.०४ एवढे दुषित पाण्याचे प्रमाण असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दुषित पाण्याचे शुद्धीकरण करणाच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२५-०९-२०१८) :** (१) हे अशंत:खरे आहे,

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील माहे एप्रिल २०१८ मध्ये ग्रामीण भागात तपासण्यात आलेल्या एकूण १२८१ सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यापैकी १३५ नमुने दूषित आढळलेले असून दूषित नमुने टक्केवारी १०.५४ एवढी आहे. तसेच शहरी भागातील तपासण्यात आलेल्या ९९ नमुन्यांपैकी ४ नमुने दुषित आढळलेले असून दूषित पाण्याची टक्केवारी ४.०४ एवढी आहे. तसेच ऑगस्ट २०१७ मध्ये ग्रामीण भागात तपासण्यात आलेल्या एकूण १३२४ सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या नमुन्यापैकी ४७ नमुने दूषित आढळलेले असून दूषित नमुने टक्केवारी ३.५ एवढी आहे.

(२) गट विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी,वैद्यकीय अधिकारी,प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेकडून पाणी शुध्दीकरणाबाबत करावयाच्या उपाययोजना व दूषित पाणी नमुने प्रमाणात वाढ होवू नये याकरिता प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यात आलेली आहे.

पाणी नमुने दूषित आढळलेल्या स्त्रौताचे संबंधित ग्रामपंचायती मार्फत टी.सी.एल. भुकटीद्वारे शुध्दीकरण करण्यात आले असून ओ.टी. टेस्ट घेण्यात आलेली आहे. तद्नंतर दूषित आढळलेल्या पाणी स्त्रोतातील पाण्याच्या नमुन्यांची फेर तपासणी केली असता सदर पाणी योग्य असल्याचे आढळले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ऑलिम्पिक स्पर्धाव्यतिरिक्त खेळ खेळणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण मिळण्याबाबत

**(३२) ११८०९६ (२०-०७-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केवळ ऑलिम्पिक स्पर्धा खेळाडूंना शासकीय नोकरीत ५ टक्के आरक्षण देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्रात एकूण ८७ खेळ खेळले जात असून या खेळातील खेळाडूंना देखील शासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण लागू करण्यात यावे अशी मागणी विविध क्रीडा संघटना आणि खेळाडू शासनाकडे करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने राज्यातील ऑलिम्पिक स्पर्धा खेळणाऱ्या खेळाडूंव्यतिरिक्त इतर खेळ खेळणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत ५ टक्के आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०९-२०१८) :** (१) होय, अशंत: खरे आहे.

ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धा शिवाय एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स या स्पर्धामधील क्रीडा प्रकार व त्याशिवाय बुध्दीबळ, कबड्डी, खो-खो व मल्लखांब हे देशी खेळ, शासकीय नोकरीत ५ टक्के आरक्षणासाठी दि.०१.०७.२०१६ च्या शासन निर्णयान्वये व दि.१५.११.२०१७ च्या शुध्दीपत्रकान्वये पात्र ठरविण्यात आले आहेत.

(२) व (३) होय, तथापि शासनाने घेतलेला निर्णय जाणीवपूर्वक घेतला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**डहाणूतील (जि.पालघर) दहयाले चरीपावन ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ५० टक्क्याहुन अधिक कुटुंबांकडे शौचालये नसल्याबाबत**

**(३३) ११८२९४ (२५-०७-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहयाले चरीपावन (ता.डहाणू, जि.पालघर) ग्रामपंचायतीच्या हद्दीतील ५० टक्क्याहुन अधिक कुटुंबांकडे शौचालये नसल्याने त्यांना नैसर्गिक विधीसाठी उघड्यावर बसावे लागत असून हे गांव १०० टक्के हगणदारी मुक्त झाल्याचा अहवाल जिल्हा प्रशासनाने राज्य शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गाव १०० टक्के हगणदारी मुक्त झाल्याचे खोटा अहवाल पाठवून मा.मुख्यमंत्र्यांची पर्यायाने शासनाची दिशाभूल करण्यास जबाबदार असणाऱ्या जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१७-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.
पायाभूत सर्वेक्षण,२०१२ नुसार ग्रुप ग्रामपंचायत, दहयाले येथे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत वैयक्तिक शौचालयाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. मात्र इंदिरा आवास योजने अंतर्गत बांधकाम झालेल्या ३७४ वैयक्तिक शौचालयांपैकी १९२ शौचालये नादुरुस्त स्थितीत आहेत. सदर कुटुंबे सामुहिक व सार्वजनिक शौचालयांचा वापर करत असल्याने स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत ग्रामपंचायत, दहयाले हागणदारीमुक्त घोषित करणेबाबतचा ठराव पंचायत समिती, डहाणू यांचेमार्फत जिल्हा परिषद, पालघर यांना प्राप्त झाला आहे. सदर ठराव अहवालासह जिल्हा परिषदेकडून शासनास सादर करण्यात आला आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली जिल्हयातील विविध पाणी पुरवठा योजनांना निधी उपलब्ध करुन प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत**

**(३४) ११८७४४ (२३-०७-२०१८). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.वसंतराव चव्हाण**

**(नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील दोन मुख्यमंत्री पेयजल योजनेच्या कामासाठी दोन कोटी रुपयाची गरज असताना शासनाने केवळ रुपये २० लाख निधी दिल्यामुळे मंजूर झालेली पाणी पुरवठा योजना व सिंचनाची कामे प्रलंबित असणे, चारपैकी तीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांच्या दुरुस्तींला दोन वर्षापासून निधी मंजूर असून तांत्रिक तपासणी अहवालासाठी साडेबारा लाख रुपये न भरल्याने प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात न येणे, मौजे येहळेगाव (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत अंदाजपत्रकात मान्यता देऊन निधी उपलब्ध न होणे, औंढा नागनाथ तालुक्यातील २२ तांडयामध्ये निर्माण झालेली पाणी टंचाई दुर करण्याच्या नावाखाली लाखो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात येणे तसेच कळमनुरी तालुक्यातील पाणी टंचाईमुळे ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत हिंगोली जिल्ह्यातील रु.१०.०७ कोटी इतक्या किंमतीच्या ०५ पाणीपुरवठा योजनांना मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी केवळ दोन योजनांच्या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले असल्याने सदर दोन योजनांच्या पहिल्या टप्याच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास रु.१८७.६४ लक्ष व जिल्हा परिषदेस रु.२०.६२ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. अन्य योजनांच्या कामाचे कार्यादेश देण्यात आल्यानंतर सदर योजनांना निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

पुनरुज्जिवित करावयाच्या तीन प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उपस्थित केलेल्या तांत्रिक त्रुटीची पुर्तता जिल्हा परिषदेकडून करण्यात येत आहे. तसेच सदर योजनांच्या तांत्रिक तपासणीसाठी शुल्क आकारण्यात येऊ नये अशा सूचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास शासन स्तरावरुन देण्यात आल्या आहेत.

औंढा नागनाथ तालुक्यात टंचाई कालावधीत उपाययोजना राबवितांना कोणताही गैरव्यवहार झालेला नाही. तसेच कळमनुरी तालुक्यातील टंचाई दूर करण्यासाठी ९ गावांना टँकरने, ६६ गावांना ९२ विंधन विहिरी/बोअर अधिग्रहण करुन पाणीपुरवठा करण्यात आला आहे. १३ योजनाची विशेष दुरुस्ती मंजूर असून त्याची अंमलबजावणी सुरु आहे.

(२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील मुख्यमंत्री पेयजल योजनेतील टप्पा १ मधील ४ कामे अव्यवहार्य ठरल्याबाबत

**(३५) १२०१३६ (२३-०७-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील मुख्यमंत्री पेयजल योजनेतील टप्पा १ मधील बल्लाळवाडी, टाकळीहाजी, खडकी, आळंदी म्हातोबाची अशी एकूण ४ कामे नामंजूर केल्याने त्याच्या ऐवजी खेड (जि.पुणे) तालुक्यातील गाव मौजे काळूस आणि रोहकल या दोन गावांचा समावेश टप्पा १ मधे करण्यात यावा अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ मे, २०१८ रोजी मा.पाणीपुरवठा मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने खेड तालुक्यातील गाव मौजे काळूस आणि रोहकल या गावांचा समावेश मुख्यमंत्री पेयजल योजना टप्पा १ मधे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-०९-२०१८) :** (१) होय.

(२) मौ. रोहकल (ता. खेड) या गावासाठी स्थानिक मागणीनुसार राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २०१२-१३ मध्ये योजना राबवून ग्रामपंचायतीकडे देखभालीसाठी हस्तांतरित केली आहे. सदर योजनेतून पुरेशा क्षमतेने पाणीपुरवठा सुरु आहे. त्यामुळे गावठाणासाठी नवीन योजनेची मागणी नाही.

तसेच मौ. काळूस (ता. खेड) ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार वाटेकरवाडी, पवळेवाडी, माळवाडी (बिवरवाडी) या वस्त्यांचा समावेश राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सन २०१८-१९ च्या कृती आराखड्यात करण्यात आला आहे. त्यानुसार योजनेचे सर्वेक्षण व अंदाजपत्रके तयार करण्याचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील पाणी टंचाईच्या उपाययोजनांसाठी स्थापन केलेल्या पथकाच्या अहवालाबाबत

**(३६) १२१५१२ (२३-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील पाणी टंचाईच्या उपाययोजनांचा आढावा घेण्याकरिता पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने मंत्रालयीन स्तरावरील पथकाचे गठण करण्यात आले असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पथकाने वाशिम, अकोला, यवतमाळ व अमरावती जिल्हयातील ग्रामीण तसेच नागरी भागातील टंचाई उपाययोजनेअंतर्गत शासनस्तरावरुन मान्यता देण्यात आलेल्या उपाययोजनांच्या कामांची पाहणी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, वाशिम जिल्हयात मुख्यमंत्री पेयजल योजनेंतर्गत जिल्हयातील १० पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवत करण्यात आले मात्र बहुतांश प्रकल्प कोरडे पडल्यामुळे गावक-यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी पाहणी पथकाने दिलेल्या अहवालानुसार शासनाने विदर्भातील पाणी टंचाई दूर करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) वाशिम जिल्हयातील मुख्यमंत्री पेयजल योजने अंतर्गत १० प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांचे पुनरुज्जीवन करण्याची कामे प्रगतीत असून सन २०१९ मध्ये सदर योजना कार्यान्वीत करण्याचे नियोजन आहे. तथापि सन २०१७ चे पावसाळयात धरणामध्ये जलसाठा कमी झाल्याने उन्हाळयात १० योजनांपैकी २ योजनांचे उद्भव कोरडे पडल्याचे दिसून आले.

त्याचप्रमाणे वाशिम जिल्हयात पिण्याचे पाणी टंचाई निवारणार्थ, सन २०१७-१८ करिता एकूण ५१० गावांकरिता ५७८ उपाययोजनांचा समावेश असलेला अंदाजे रु. ४४८.५० लाख एवढया किंमतीचा पिण्याचे पाणी टंचाई आराखडा मंजूर करण्यात आला होता.

तसेच पिण्याचे पाणी टंचाई अंतर्गत ४७ गावांना ४४ टँकरव्दारे व २५४ गावांना ३२७ विहिर/बोअर अधिग्रहणाव्दारे पाणी पुरवठा करणे या उपाययोजना ग्रामपंचायतींच्या मागणी नुसार राबविल्या आहेत.

त्यामुळे वाशिम जिल्हयात, टंचाई कालावधीत पिण्याच्या पाण्यासाठी गावकरी पाण्यासाठी भटकंती करतांना आढळून आले, ही बाब खरी नाही.
(४) पाहणी पथकाने शासन स्तरावरुन मान्यता देण्यात आलेल्या उपाययोजनांचा आढावा घेतला होता. त्या अनुषंगाने उपाययोजना पूर्ण करुन तातडीने पाणी पुरवठा करण्यासंबंधी सूचना दिल्या होत्या. तसेच संभाव्य टंचाई कृती आराखडयानुसार आवश्यक त्या पाणी टंचाई उपाययोजना घेऊन विदर्भातील पाणी टंचाई निवारणार्थ आवश्यक कार्यवाही सर्व संबंधितांकडून करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) नगरपरिषद क्षेत्र व ग्रामपंचायतींसाठी अन्न धान्य वितरण अधिकाऱ्याचे स्वतंत्र कार्यालय मंजुर करण्याबाबत

**(३७) १२१९९८ (२३-०७-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी (जि.कोल्हापूर) नगरपरिषद क्षेत्र व ग्रामपंचायतींसाठी अन्न धान्य वितरण अधिकाऱ्याचे स्वतंत्र कार्यालय मंजुर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इचलकरंजी शहरासाठी १ पुरवठा निरिक्षण अधिकारी (नायब तहसिलदार दर्जा) आणि ३ पुरवठा निरिक्षक (अव्वल कारकुन दर्जा) अशी पदे शहरातील परवान्यांच्या तपासणीसाठी मंजुर असून त्यापैकी पुरवठा निरीक्षण अधिकारी (नायब तहसिलदार दर्जा) हे पद अन्न धान्य वितरण अधिकारी (नायब तहसिलदार दर्जा) म्हणून रूपांतरीत करण्याची मागणी निवेदनात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (१९-०९-२०१८) :** (१), (२), (३) व (४) विभागातील पदांचा आकृतीबंध निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. आकृतीबंधाचा प्रस्ताव अंतिम टप्प्यावर आहे.

---

## उपकुमार (सब ज्युनिअर) गटातील राज्यस्तर प्राविण्यप्राप्त कबड्डी खेळाडूंना नोकर भरतीमध्ये ५ टक्के "क" वर्गीय पदाकरिता पात्र ठरविण्यास होत असलेला विलंब

**(३८) १२२१८० (२०-०७-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपकुमार (सब ज्युनिअर) गटातील राज्यस्तर प्राविण्यप्राप्त कबड्डी खेळाडूंना ५ टक्के नोकर भरतीमध्ये क वर्गीय पदाकरिता पात्र ठरविण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.क्रीडा व युवक कल्याण मंत्री, यांना दिनांक २९ मे, २०१८ ला दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समान नियमानुसार स्पर्धा खेळणाऱ्या परंतु फक्त वयोगट वेगळा असल्याने अशा खेळाडूंना योग्य वागणूक मिळत नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०९-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) सब ज्युनिअर वयोगटात खेळणारे खेळाडू हे त्यांच्या खेळ विषयक कारकीर्दिच्या प्रथम स्पर्धात्मक टप्प्यावर कामगिरी करीत असतात. त्यामुळे सदर वयोगटातील खेळाडूंनी सातत्याने सराव करुन ज्युनिअर व सिनीअर वयोगटातील अधिकच्या स्पर्धेमध्ये कौशल्य दाखविणे अभिप्रेत आहे. त्यामुळे सद्यस्थितीत सब-ज्युनिअर वयोगटातील खेळाडूंना ५ टक्के खेळाडू आरक्षण लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंधारी, सराटी, बोदवड (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) या गावांतील पाणीटंचाईबाबत**

**(३९) १२२५८१ (२३-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधारी, सराटी, बोदवड (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) या गावांत पाणी टंचाई निर्माण झाली असल्याचे तसेच चारनेर व चारनेरवाडी येथे पाणीपुरवठा करणा-या सार्वजनिक विहिरीतून काही व्यक्ती शेतीला पाणीपुरवठा करत असल्याने या गांवातही पाणीटंचाई निर्माण झाली असल्याचे दिनांक ६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत येथील ६० महिलांनी गटविकास अधिकारी व तहसिलदार यांना निवेदन देवून तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२६-०९-२०१८) :** (१) सिल्लोड तालुक्यातील (जि.औरंगाबाद) अंधारी, सराटी व बोदवड या गावांत पाणी टंचाई निर्माण झाली होती, हे खरे आहे.

तथापि चारनेर व चारनेरवाडी येथे पाणीपुरवठा करणाऱ्या सार्वजनिक विहिरीतून काही व्यक्ती शेतीला पाणीपुरवठा करत असल्याने या गांवातही पाणीटंचाई निर्माण झाली, हे खरे नाही.
(२) व (३) याबाबत ६० महिलांचे कोणतेही तक्रारीचे निवेदन तालुका स्तरावर प्राप्त झाले नाही. तथापि अशी तक्रार ग्रामपंचायतीकडे दि. २ मे, २०१८ रोजी प्राप्त झाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने वस्तुस्थिती पुढील प्रमाणे आहे :-

चारनेर व चारनेरवाडी या दोन्ही गावांसाठी चारनेर गावाजवळ असलेल्या दोन विहीरींमधून दोन स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना असून त्याव्दारे दोन्ही गावांस नियमित पाणी पुरवठा करण्यात येतो.

तसेच चारनेर गावालगत असलेल्या चारनेर मध्यम प्रकल्पात ग्रामपंचायतीच्या मालकीची आणखी एक तिसरी विहीर असून सदर विहीरीचा उपयोग उन्हाळयामध्ये पाणी टंचाई

कालावधीत करण्यात येतो. टंचाई कालावधीत ज्यावेळी नळ योजनेच्या विहीरीची पाणी पातळी कमी होते त्यावेळी सदर विहीरीवरुन पाईप लाईनव्दारे नळ योजनेच्या दोन्ही विहीरीत पाणी टाकण्यात येऊन चारनेर व चारनेरवाडी या दोन्ही गावांस नळाव्दारे पाणी पुरवठा करण्यांत येतो.

सदर तिसरी विहीर ही पाणी टंचाई कालावधीत वापरात येत असल्यामुळे दरवर्षी पाणी टंचाई कालावधीत सदर पाणी पुरवठा विहीरीवरुन पाणी पुरवठा सुरु करण्यापूर्वी साचलेल्या पाण्याचा उपसा करणे आवश्यक असते. परंतु यावर्षी ग्रामपंचायतीकडील विद्‌युत पंप नादुरुस्त असल्यामुळे ग्रामपंचायत सदस्य असलेल्या शेतकऱ्याकडून विद्‌युत पंप घेऊन सदर विहीरीतील घाण/दुर्गंधीयुक्त पाण्याचा उपसा करुन त्याच शेतकऱ्याच्या शेतात सोडण्यात आले होते. या दरम्यानच्या काळात तक्रारदारांनी यासंदर्भात दिलेल्या तक्रारीची त्वरीत दखल घेण्यात येऊन ग्रामपंचायतीकडून कार्यवाही करण्यात आली आहे व संबंधित शेतकऱ्याचा विद्‌युत पंप काढण्यात येऊन ग्रामपंचायतीचा विद्‌युतपंप तात्काळ बसविण्यात आला आहे.

त्यामुळे दिनांक २ ते ७ मे, २०१८ पर्यंत सदर घाण/दुर्गंधीयुक्त पाण्याचा उपसा करण्यात येऊन दिनांक ७ मे, २०१८ पासून सदर अस्थायी विहीरीवरुन ग्रामपंचायतीमार्फत नळ योजनेच्या विहीरीत पाणी टाकणे सुरु करण्यात आले होते. दोन्ही गावात (उक्त कालावधी वगळता) नियमितपणे सुरळीत व पुरेशा प्रमाणात पाणी पुरवठा सुरु आहे.

त्याचप्रमाणे सिल्लोड तालुक्यातील (जि. औरंगाबाद) अंधारी, सराटी व बोदवड या गावांत नळ पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा बंद झाल्यामुळे निर्माण झालेल्या पिण्याचे पाणी टंचाई निवारणार्थ टँकरव्दारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील पाणी टंचाईबाबत**

**(४०) १२३३३२ (२५-०७-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५०२ गावे, ९० वाड्यांना ५०८ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून औरंगाबाद जिल्ह्यात १६,२६९ जलयुक्त शिवाराची कामे होऊनही १९० गावे व १३ वाड्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु असल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोयगांव (जि.औरंगाबाद) शहर व ग्रामीण भागातील हातपंप नादुरुस्त होणे, तालुक्यातील ११ प्रकल्पांच्या पाणी पातळीत होत असलेली घट तसेच प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे १८ गांवात भीषण पाणीटंचाई निर्माण झाल्याचे दिनांक २७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त हातपंपाची दुरुस्ती करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच यांस जबाबदार असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबनाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

दिनांक २७.०३.२०१८ किंवा त्यापूर्वी पंचायत समिती, सोयगाव अंतर्गत एकाही ग्रामपंचायतीने पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद, पाणी पुरवठा उपविभागाकडे पाणी टंचाई उपाययोजनांची मागणी केलेली नसल्यामुळे भीषण पाणीटंचाई निर्माण झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

भूगर्भातील पाण्याच्या पातळीत घट झाल्याने काही हातपंप थांबून थांबून चालतात. तसेच पंचायत समिती, सोयगाव अंतर्गत ग्रामीण भागातील हातपंप दुरुस्तीचे काम ग्रामपंचायतीकडून तक्रार प्राप्त होताच ४८ तासांच्या आत करण्यात येते. २७ मार्च, २०१८ अखेर सोयगांव शहरी भागातील १ व ग्रामीण भागातील १७ नादुरुस्त तक्रारीचे निराकरण करुन पाणी पुरवठा चालू करण्यात आलेला आहे. त्यामुळे दुरुस्ती अभावी हातपंप बंद नाहीत.

हातपंप दुरुस्तीसाठी जिल्हा परिषदेव्दारे साहित्य पुरवठा केला जातो. त्यामुळे हातपंप दुरुस्तीची कामे केली जातात. प्रत्येक महिन्यात नादुरुस्त असलेल्या हातपंपाच्या तक्रारीचे निवारण पंचायत समितीकडील हातपंप दुरुस्ती पथकाव्दारे नियमित करण्यात येते. त्यामुळे संबंधितांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मनोर (जि.पालघर) ग्रामपंचायत परिसरातील विस्तारीत नळ पाणीपुरवठा योजनेची कामे प्रलंबित असल्याबाबत**

**(४१) १२३६०० (२५-०७-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोर (जि.पालघर) ग्रामपंचायत परिसरातील विस्तारीत नळ पाणीपुरवठा योजनेस रुपये ७ कोटी ४५ लाख इतका निधी मंजूर झाला असणे, सदर काम १८ महिन्यात पुर्ण करणे आवश्यक असतांना माहे मार्च, २०१७ मध्ये १४ महिने होऊनही ठेकेदाराने काम पूर्ण न केल्याने काजूपाडा, तांबडमाळ व धाकरपाडा येथील वस्त्यांमधील महिलांना पाण्याअभावी भटकंती करावी लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सबंधित ठेकेदार व अधिकारी यांचेकडे पाठपुरावा करुनही सदरहु काम प्रलंबित असल्याने संबंधित ठेकेदार व अधिकारी यांचे विरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२१-०९-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) वाढीव मनोर नळ पाणीपुरवठा योजनेच्या स्वीकृत निविदेनुसार अस्तित्वातील जॅकवेल व पंपगृह वापरण्याचे प्रस्तावित होते. तथापि, शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे यांनी अस्तित्वातील जॅकवेलची पाहणी करुन सादर केलेल्या अहवालनुसार काही महत्वाची अतिरिक्त कामे उद्भवली. सदर अतिरिक्त कामे करण्यास इच्छुक नसल्याचे ठेकेदाराने कळविल्यामुळे या कामांसाठी स्वतंत्र निविदा काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदर योजनेची एकूण कामे ८०% पूर्ण झाली असून योजना अंशत: कार्यान्वित करुन काजूपाडा, तांबडमाळ व धुपोंडापाडा यांना फेब्रुवारी, २०१८ पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. तथापि, सदर योजना पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाली नसल्याने पाणी पुरवठा कमी दाबाने सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उदगीर व जळकोट (जि.लातूर) तालुक्यात रेशनकार्ड विभक्त करण्याबाबत**

**(४२) १२४१०६ (२३-०७-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर व जळकोट (जि.लातूर) तालुक्यातील ६९८५५ शिधापत्रिकाधारक कुटुंबातील अनेक व्यक्ती कुटुंबापासून विभक्त झाल्या असूनही त्यांची नावे एकत्रित स्वरुपातील शिधापत्रिकांमध्ये असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, उदगीर व जळकोट तालुक्यात विभक्त रेशनकार्ड करुन देणे संदर्भातील कार्यवाही बंद असल्याने विभक्त झालेल्या अनेक कुटुंबांना शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२७-०९-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

जानेवारी, २०१८ ते मे, २०१८ या कालावधीत विभक्त शिधापत्रिकेसाठी उदगीर तालुक्यात एकूण १६ अर्ज व जळकोट तालुक्यात ३ अर्ज प्राप्त झाले असून सदर अर्जांवर कार्यवाही करुन अर्ज निकाली काढण्यात आले आहेत.

मे-२०१८ नंतर विभक्त शिधापत्रिकेसाठी एकूण ४० अर्ज प्राप्त झाले असून त्यानुसार ४० विभक्त नविन शिधापत्रिका देणेबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील शाळांमधील वर्गखोल्या मोडकळीस आल्याबाबत**

**(४३) १२४४६३ (२३-०७-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील ५७९ शाळांमधील २२६ वर्गखोल्या मोडकळीस आल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनानाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार या मोडकळीस आलेल्या वर्गखोल्यांची पावसाळयापूर्वी दुरुस्ती करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-१०-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

५७९ शाळांतील १२२६ वर्गखोल्यांची दुरूस्ती आवश्यक आहे.

(२) जिल्हा नियोजन समितीकडून २०१८-१९ मध्ये २७४ शाळांमध्ये दुरूस्तीची कामे मंजूर करण्यात आली असून ७० नवीन वर्गखोल्याही मंजूर करण्यात आल्या आहेत. तसेच १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून प्राधान्याने शाळा दुरूस्तीची कामे करून घेणेबाबत ग्रामपंचायतींना सूचित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील पाणीपुरवठा योजना कालबाह्य झाल्याबाबत**

**(४४) १२४९९७ (२५-०७-२०१८). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवळा (जि. नाशिक) तालुक्यातील पाणीपुरवठा योजना या कालबाह्य झाल्याने तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याने अनेक गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा केला जात असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तालुक्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी पाणीपुरवठा योजनेच्या प्रस्तावांना तातडीने मान्यता देऊन पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-०९-२०१८) :** (१) अंशतः खरे आहे.

देवळा तालुक्यातील ३ गावे व ६ वाडयांना टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(२) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम कृती आराखडा २०१८-१९ मध्ये देवळा तालुक्यातील ९ गावांचा समावेश करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केळापूर (जि.यवतमाळ) येथील रेशनवाटप करणाऱ्यांसंदर्भात खोटा अहवाल सादर केल्याबाबत**

**(४५) १२५११३ (२३-०७-२०१८). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळापूर (जि.यवतमाळ) येथील रेशनमाफीया श्री.दत्तात्रय मुस्तीलवार व श्री.योगेश मुस्तीलवार यांना संरक्षण देणाऱ्या तहसिलदार श्री.शैलेश काळे तसेच तत्कालिन पुरवठा निरीक्षण अधिकारी श्री.हनमंतु रजनलवार यांची चौकशी करणे, धान्य माफीयांना संरक्षण देणे तसेच त्यांच्या संदर्भात पाठविलेल्या खोटया अहवालाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींविरोधात कारवाई करण्याची लेखी मागणी श्री.विनोद दामोदर सिंघानिया सरचिटणीस, यशवंतराव चव्हाण सोशल फोरम, महाराष्ट्र प्रदेश शास्त्री नगर, पांढरकवडा, केळापूर (जि.यवतमाळ) यांनी दिनांक २५ मे, २०१५ रोजी व तद्नंतर अनेकदा जिल्हाधिकारी, यवतमाळ, जिल्हा पुरवठा अधिकारी, यवतमाळ, विभागीय आयुक्त, अमरावती, मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मा.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांचकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजी मा.अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांचेकडे सविस्तर निवेदन सादर केले असता त्यांनी "तातडीने चौकशी करून १५ दिवसात अहवाल" सादर करण्याचे आदेश उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (२७-०९-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय, रास्तभाव धान्य दुकानदार श्री.दत्तात्रय मुस्तीलवार यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी खालच्या न्यायालयाकडून दोषमुक्त केले आहे. या आदेशाविरुध्द जिल्हा व सत्र न्यायालयात अपिल दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. दोषी अधिकारी/ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे. सदर प्रकरण जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीपुढे सादर केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुलाबा, मुंबई येथील रंगभवन या ऐतिहासिक खुल्या रंगमंचाच्या नुतनीकरणाबाबत**

**(४६) १२५१५५ (२०-०७-२०१८). श्री.राज पुरोहित (कुलाबा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील कुलाबा मतदार संघातील मेट्रो सिनेमा स्थित रंगभवन हे ऐतिहासिक एकमेव खुले रंगमंच गेल्या कित्येक वर्षापासून बंद असल्याचे माहे जून २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रंगमंच बंद असल्यामुळे शासनाच्या महसुलात घट होत आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रंगमंचाच्या दुरुस्ती व नुतनीकरणाकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१८-०९-२०१८) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयानुसार रंगभवन व आजुबाजुचा परिसर शांतता क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. त्यामुळे रंगभवन व तेथील कार्यक्रमांवर पूर्णत: बंदी आहे.
(३) रंगभवन व आजुबाजुचा परिसर शांतता क्षेत्र म्हणून घोषित केल्याने सदर वास्तुचा वापर करणे शक्य नाही. त्यामुळे सदर प्रकरणी निश्चित कोणती कार्यवाही करता येऊ शकेल याबाबत पर्यावरण विभागास विचारणा करण्यात आली आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील शाहु महाराज वस्तुसंग्रहालयाच्या प्रलंबित कामाबाबत

**(४७) १२५६८६ (२०-०७-२०१८). श्री.अमल महाडीक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील छत्रपती शाहु महाराजांच्या जन्मस्थळी शासनाने महाराजांच्या जीवनावर आधारीत वस्तूसंग्रहालय उभारणीचा महत्वपूर्ण निर्णय घेऊन अंदाजे रुपये १५ कोटी ६० लक्ष इतक्या निधीची मान्यता दिली असून पहिल्या टप्प्याच्या कामाला रुपये २ कोटी इतका निधी उपलब्ध् केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वस्तूसंग्रालयाच्या उभारणीच्या कामाची सद्यस्थिती काय आहे तसेच पहिल्या टप्प्याचे काम किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, निविदा प्रक्रियेस विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२८-०९-२०१८) :** (१) हे खरे आहे.
छत्रपती शाहु महाराजांच्या जीवनावर आधारीत वस्तुसंग्रहालय उभारणीच्या रू.२,०८,२९,५६८/- इतक्या रक्कमेच्या सुधारित अंदाजपत्रकास दिनांक २१ जून, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) दि.०५ जुलै, २०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर वस्तुसंग्रहालयाच्या उभारणीच्या न्युनतम निविदेस मान्यता देण्यात आली आहे. सदर वस्तुसंग्रहालय उभारण्याचे काम पुरातत्वीय संकेतानुसार करावयाचे असल्याने निश्चित कालावधी नमूद करता येणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील प्रादेशिक पाणीपुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत

**(४८) १२५७७२ (२५-०७-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील ३२ गावांतील प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या प्रलंबित कामांसाठी सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर पाणीपुरवठा योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२४-०९-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) प्रस्तुत योजनेच्या कामाच्या संकल्पनेत बदल झाल्यामुळे खर्चात वाढ झाली आहे. वाढीव खर्चाच्या अनुषंगाने तपासणी करुन सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### तुळजापूर (जि.सोलापूर) तालुक्यातील पाणी पुरवठा योजनांच्या प्रलंबित कामांबाबत

**(४९) १२५८८२ (२५-०७-२०१८). श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचोली, दिंडेगाव, मानमोडी, मुर्टा व कात्री (ता.तुळजापूर, जि.सोलापूर) या गावांसाठी राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत नळपाणी पुरवठा योजना मंजूर आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील योजनांचे कार्यारंभ आदेश कधी दिलेले आहेत, त्यानुसार सदर योजना पूर्ण करण्यासाठीचा कालावधी किती वर्षे आहे, कालावधी पूर्ण होऊनही कामे पूर्ण झाली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, लाखो रुपये खर्च होऊन तसेच टेंडरमधील अटी व शर्तीनुसार कामे न झाल्याने सदर कामास विलंब करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर शासनाने काेणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२८-०९-२०१८) :** (१) होय.

(२) अ.क्र. योजनेचे नाव कार्यारंभ आदेश दिनांक कामाचा पूर्ण करण्याचा कालावधी

१ चिंचोली ०७/०४/२०१५ १२ महिने

२ दिडंगाव १७/०४/२०१५ १८ महिने

३ मानमोडी १३/०५/२०१५ १२ महिने

४ मुर्टा २७/०६/२०१५ ०६ महिने

५ कात्री २०/१२/२०१२ २४ महिने

राष्ट्रीय ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या सर्व कामांची अंमलबजावणी जसे मागणी, निविदा, निविदा स्विकृती, योजनेचे कार्यारंभ देणे, कामावर नियंत्रण कार्यान्वयन व योजना पूर्ण झाल्यावर देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी ग्राम पाणी पुरवठा समित्यांची आहे. वरील कामे पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व कंत्राटदार यांच्या दुर्लक्षामुळे विहित कालावधीत पूर्ण न झाल्याने सदर योजना प्रलंबित आहेत.

(३)ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती व कंत्राटदार यांचेमध्ये समन्वय नसल्याने ज्या योजना रखडलेल्या आहेत अशा योजनांच्या कामाचे कार्यान्वयन व संनियत्रण हे शासनाच्या दिनांक ९ मार्च, २०१८ रोजीच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या यंत्रणेकडे देण्यात आलेले आहे, त्यानुषंगाने योजना पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळाच्या मराठी भाषा तज्ञ समितीचे अध्यक्ष पद रिक्त असल्याबाबत

**(५०) १२६३२५ (२३-०७-२०१८). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळाच्या मराठी भाषा तज्ञ समितीचे अध्यक्ष पद गत तीन वर्षापासुन रिक्त असल्याचे माहे मार्च २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अध्यक्ष नियुक्त न करता फक्त समिती गठीत केली असून उक्त समिती सदस्यांनी दिनांक २९ डिसेंबर २०१७ रोजी वा त्या सुमारास अध्यक्षाविना झालेल्या बैठकीत अभ्यासक्रम तयार करुन बालभारती, सुभम भारती व कुमार भारती या पुस्तकांना निर्धारित करण्यास मान्यता देवून प्रकाशीत करण्यात आली हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार उक्त अध्यक्ष पद नियुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ४९१ (38)

**श्री. विनोद तावडे (२५-०९-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मराठी भाषा समितीचे गत १० महिन्यापासून रिक्त असलेले पद नियुक्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.